# अहमदनगर जिल्हा परिषद

## बांधकाम विभागामध्ये विविध योजनांचे नियोजन व आराखडा तयार करण्याची कार्यपध्दती

## योजना

- ❖ अर्थसंकल्पीय कामे
- ❖ रस्ते दुरुस्ती कार्यक्रम
- ❖ राष्ट्रीय समविकास योजना
- ❖ १२ वा वित्त आयोग
- ❖ १२ वा वित्त आयोग (राज्यस्तर निधी)
- ❖ जिल्हा परिषद सेस
- ❖ योजनांची प्रशासकीय मंजूरी

**अर्थसंकल्पीय कामे**

**सदर योजना शासन स्तरावरील आहे, योजनेअंतर्गत खालील प्रकारची कामे घेतली जातात रस्ते बांधणी, खडीकरण, डांबरीकरण, व मो-यांची कामे मा.आमदार खासदार यांनी सुचविलेल्या कामांचा विचार करुन आराखडा तयार करुन सा.बां.मंडळा मार्फत शासनास सादर केला जातो.शासनाकडुन सदरची कामे अर्थ संकल्पात समाविष्ट करुन कार्यक्रम मंजूर केला जातो, त्यानंतर अनुदानाच्या उपलब्धतेनुसार कामे हाती घेतली जातात**

TOP

**रस्ते दुरुस्ती कार्यक्रम**

**सदर कार्यक्रमामध्ये खालीलप्रमाणे संवर्गात कामे केली जातात**

**गट अ -(सर्वसाधारण दुरुस्ती) [Current Repair]**

यामध्ये खालील प्रकारची कामे घेता येतात.

१) रस्त्याच्या डांबरी व खडीच्या पृष्ठभागावरील खडडे भरणे.

२) गटारे खणणे व सुस्थतीत राखणे.

३) नवीन गटारे खणणे.

४) बाजुपटटया तासणे/बाजुपटटयांना योग्य उतार राखणे.

५) उखडलेले कठडे व पॅरापीट इत्यादाची पुर्नबांधणी करणे.

६) किरकोळ स्वरुपात वाहुन गेलेल्या भरावाची पुनरस्थापना करणे.

**गट ब -(रस्त्याचा दर्जा टिकवीण्याची / सुधारण्याची कामे)**

यामध्ये खालील प्रकारची कामे घेता येतात.

१) रस्त्याची विशेष दुरुस्ती / सुधारणा.

२) डांबरी रस्त्याचे नुतनीकरण करणे.

३) खडी पृष्ठभागाचे नुतनीकरण करणे.

**गट क -(विशिष्ट प्रयोजनाची कामे)**

यामध्ये खालील प्रकारची कामे घेता येतात.

१) कमकूवत पुलांची दुरुस्ती / मजबुतीकरण करणे.

२) लहान मो-यांची बांधकामे व सुधारणा.

**गट ड -(अन्य व संकिर्ण कामे)**

यामध्ये उपरोक्त अ,ब,क मध्ये समाविष्ट नसणा-या प्रकारची कामे घेता येतात.

**गट इ -(पुरहानी दुरुर्स्ती कामे)**

यामध्ये पावसाच्या पाण्याने आलेल्या पुरामुळे नुकसान झालेल्या रस्ता व मो-यांची दुरुस्तीची कामे घेता येतात. (CURRENT REPAIR) व गट ब ते ड अंतर्गत दुरुस्तीच्या कामांना एस.आर. (SPECIAL REPAIR) असे संबांधतात.

**अमंलबजावणीची कार्यपध्दती**

सदर योजना रस्ते विकास योजना अंतर्ग नकाशामध्ये असणा-या प्लॅ्न रोडवर राबविण्यात येतात दरवर्षी या कामासाठी उपलब्ध होणा-या अनुदानाच्या प्रमाणात कार्यक्रम मंजुर केला जातो.उपविभागीय स्तरावर कार्यालयास पाठविला जातो. सदर गटनिहाय कार्यक्रम अपूर्ण कामांची समावेश करुन अधिक्षक अभियंता सा.बां. मंडळ अहमदनगर यांचेमार्फत शासनास जुलै / ऑगस्ट महिन्यात सादर केला जातो. शासनाकडून या कार्यक्रमात मंजूरी मिळाल्या नंतर (नाव्हेबर महिन्यात) अंदाजपत्रक तयार करणे व निविदा प्रक्रिया करणे इत्यादाची कार्यवाही होऊन मार्च अखेर ही कामे पूर्ण करण्याचे उदिदष्ट दिले जाते.

TOP

**राष्ट्रीय समविकास योजना**

सदरची योजना ही केद्रशासन पुरस्कत असून सन २००५-०६ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

सदर योजनेचे कार्यान्वीन नियंत्रण जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांचेमार्फत केले जाते.

या योजनेतून खालील प्रकारची कामे घेण्यात येतात.

१) प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामे

२) प्राथमिक आरोग्य उपकेंद्र बांधकामे

३) रस्त्यावरील मो-यांची बांधकामे

४)अंगणवाडी बांधकामे

केंद्रशासनाकडून आलेल्या अनुदानाचे वरील जि.ग्रा.वि.यं. कार्यालयामार्फत विषिष्ट प्रमाणात वाटप केले जाते. त्या नुसार तालुका निहाय आराखडा तयार करुन क्ष्यास अध्यक्ष जि.ग्रा.वि.यं. तथा मु.का.अ.जि.प.अ.नगर यांची प्रशासकीय मंजुरी घेतली जाते. अंगणवाडीची बांधकामे गट विकास अधिकारी यांचेमार्फत केली जातात. उर्वरीत प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र, मो-यांची बांधकामे बांधकामे जि.प. विभागामार्फत केली जातात.

**TOP**

## १२ वा वित्त आयोग

केंद्र शासनाच्या १२ वित्त आयोगाच्या शिफारसी नुसार प्रचायत राज संस्थाना बळकटी करणासाठी सन २००५ ते २०१० या पाच वर्षाच्या कालावधीसाठी जिल्हा परिषदेला निधी मिळणार आहे. सदर निधीतुन हाती घ्यावयाच्या कामांना खर्चाच्या गरजेसह अंदाजपत्रक आराखडयास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात येते. सदर योजने अंतर्गत मिळणा-या निधीचे जिल्हा परिषद स्तर, पंचायत समिती स्तर, ग्रामपंचायत स्तर या तीन स्तरावर वाटप करण्यात येते. त्या मधून खालील लोकाभिमुख विकासाची बांधकामे घेण्यात येतात.

१) गावांतर्गत सिंमेट कॉक्रीटची गटारे व अनुषंगीक रस्ते

२) तिर्थ क्षेत्राच्या ठिकाणी पाणी पूरवठा व स्वच्छता, सोई सुविधा

३) प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती

४) ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम

५) शाळा इमारत व स्वच्छतागृहांची दुरुस्ती

६) दहन व दफनभुमी व्यवस्था

७) अंगणवाडी दुरुस्ती, देखभाल

८) पशू वैद्यकीय दवाखाना दुरुस्ती

९) गटारे व अनुषंगीक रस्ते दुरुस्ती व देखभाल

१०) सार्वजनिक स्वच्छतागृह दुरुस्ती

११) ग्रामपंचायत कार्यालय देखभाल व दुरुस्ती

### योजना अमंल बजावणीची कार्यपध्दती

१) जिल्हा परिषद स्तरावरील कामांना सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यावर प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता , निविदा कार्यवाही केली जाते.

२) पंचायत समिती स्तरावरील कामांची पंचायत समिती स्तरावरुनच अमंल बजावणी केली जाते

३) ग्रामपंचायत स्तरावरील कामांची ग्रामपंचायत स्तरावरुनच अंमल बजावणी केली जाते.

TOP

## १२ वा वित्त आयोग (राज्यस्तर निधी)

१२ व्या वित्त आयोगाच्या शिफारसी नुसार केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे मिळणा-या अनुदानातुन जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या आखत्यारीतील इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्ग या रस्त्यांचे डांबरी पृष्ठभागाच्या नुतनीकरणाची कामे घेतली जातात. सदरची योजना सन २००६-०७ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये रस्क्ष्यांची किमान २.५० किमी लांबी दुरुस्तीसाठी विचारात घेण्यात यावी.

## योजना अमंल बजावणीची कार्यपध्दती

शासनाने निर्धारीत केलेल्या अनुदानाच्या प्रमाणात तालुका निहाय रस्ते दुरुस्तीचा कार्यक्रम मा.आमदार यांच्या शिफारसीनुसार तयार करुन अधिक्षक अभियंता कार्यालय यांच्या मार्फत शासनास सादर केला जातो. शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर कामे हाती घेण्याची कार्यवाही करण्यात येते.

TOP

## जिल्हा परिषद सेस

**जिल्हा परिषद सेस अंतर्गत खालील प्रकारचे कामे घेण्यात येतात.**

१) रस्ते दुरुस्ती देखभाल

२) दळणवळणासाठी नावा, होडया खरेदी करणे

३) पंचायत समिती कार्यालये, निवासस्थाने विश्रामगृह, दुरुस्ती देखभाल

४) दहन दफनभुमी व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती

५) पर्यटन व तिर्थक्षेत्र या ठिकाणी सोयी सुविधा उपलब्ध करणे

६) पंचायत समितीच्या आवारात नारी भवन बांधणे

## योजना अमलबजावणीची कार्यपध्दती

जिल्हा परिषदे कडील पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, सभापती पंचायत समिती यांनी सुचविलेल्या कामाच्या मागणीनुसार व उपलब्ध अनुदानानुसार वरील योजनांची कामे घेता येतात.

TOP

**खालील योजनांची प्रशासकीय मंजूरी ही ज्या त्या खात्यामार्फत केली जाते व त्याच्या बांधकामाची अंमल बजावणी, व तांत्रिक मंजुरी देणे, कामे सुरु करणे व पूर्ण करण्याची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत केली जातात.**

| अ.क्र. | योजनेचे / लेखाशिर्षकाचे नांव | कोणत्या विभागामार्फत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही केली जाते. |
|---|---|---|
| १. | यशवंत ग्रामसमृध्दी योजना | जि.प.अंतर्गत ग्रामपंचायत विभाग |
| २. | दलितवस्ती सुधार योजना | जि.प.समाजकल्याण विभाग |
| ३. | शिक्षण विभागाकडील कामे | जि.प.शिक्षण विभाग |
| ४. | स्थानिक विकास कार्यक्रम (आमदारांचा,खासदारांचा) | जिल्हाधिकारी नियोजन विभाग, अहमदनगर |
| ५. | डोगरी विकास कार्यक्रम | जिल्हाधिकारी नियोजन विभाग, अहमदनगर |
| ६. | आरोग्य विभागाकडील कामे प्राथ.आरोग्य केंद्र,उपकेंद्र | जि.प.आरोग्य विभाग |
| ७. | पशूवैद्यकीय दवाखाने बांधणे व दुरुस्ती | जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी जि.प.अहमदनगर |
| ८. | अंगणवाडी इमारती बांधकामे | जि.प.महिला व बालकल्याण विभाग |
| ९. | ग्राम सचिवालय बांधणे | जि.प. ग्रामपंचायत विभाग |
| १०. | राष्ट्रीय समविकास योजने अंतर्गत मो-या, अंगणवाडी, प्रा.आ.केंद्र | जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा |
| ११. | नैसर्गीक आपत्ती अंतर्गत रस्ते, इमारत, दुरुस्ती | जिल्हाधिकारी, अहमदनगर |
| १२. | ठक्कर बाप्पा आदिवासी विकास कार्यक्रम | प्रकल्प अधिकारी, आदीवासी विकास विभाग, राजुर |
| १३. | रोजगार हमी योजना | जिल्हाधिकारी, अहमदनगर |
| १४. | महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना | जिल्हाधिकारी, अहमदनगर |
| १५. | तिर्थ क्षेत्र विकास कार्यक्रम (क वर्ग) | जि.प.ग्रामपंचायत विभाग |

**TOP**